ePaper

# एक्झिट पोलमधील अंदाज विरोधात असूनही 'आप'ला आहे विजयाची खात्री!



| वर्ष - 8 | अंक - 204 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 6 फेब्रुवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- तिकीट विक्रीदरम्यान चेंगराचेंगरी!
- प्लेअर ऑफ द टूर्नामेंट' बाबत रैनाचं भाकीत
- मेक इन इंडियाबाबत राहुलचा सल्ला
- परतलेल्या स्थलांतरितांची चौकशी


## शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेसला भाजपचा शह?

# आता पालकमंत्र्यांऐवजी संपर्कमंत्री!

### पालकमंत्री नसलेल्या 17 जिल्ह्यांबाबत मोठा निर्णय

**| मुंबई | महाईन्यूज**

**उपमुख्यमंत्री अजित पवार पालकमंत्री असलेल्या पुणे आणि बीड जिल्ह्यात अनुक्रमे चंद्रकांत पाटील, पंकजा मुंडे हे भाजपचे जिल्हा संपर्कमंत्री असतील.**



रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदावरून राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेत रस्सीखेच असताना भाजपने संपर्कमंत्री म्हणून या जिल्ह्याची जबाबदारी सांस्कृतिक कार्यमंत्री आशीष शेलार यांच्यावर सोपवली आहे. तर, नाशिक जिल्हा पालकमंत्रिपदाला स्थगिती मिळाल्याने सध्या या पदापासून वंचित असलेल्या गिरीश महाजन यांच्याकडे संपर्कमंत्री म्हणून जळगाव जिल्ह्याची धुरा देण्यात आली आहे. उद्योगमंत्री उदय सामंत पालकमंत्री असलेल्या रत्नागिरी जिल्ह्यात भाजपने जिल्हा संपर्कमंत्री म्हणून नितेश राणे यांची, तर नंदुरबार जिल्ह्यात जयकुमार रावल यांची नियुक्ती केली आहे.

पालकांच्या खिशाला बसणार फटका! 1 एप्रिलपासून शालेय बसच्या भाडेदरात थेट 18 टक्क्यांनी वाढ

### समांतर सत्ताकेंद्राची चर्चा

शिवसेना तसेच आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे पालकमंत्री असलेल्या जिल्ह्यांत संपर्कमंत्री नेमून भाजपने पक्षीय पातळीवर समांतर सत्ताकेंद्र तयार केल्याची चर्चा आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या स्वाक्षरीने या नियुक्त्या घोषित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे नजीकच्या काळात शिंदे आणि अजित पवार यांच्याकडूनही जिल्हा संपर्कमंत्री नेमले जाण्याची शक्यता आहे.

### भाजपचे जिल्हानिहाय इतर संपर्कमंत्री

गोंदिया : पंकज भोयर, बुलढाणा : आकाश फुंडकर, यवतमाळ : अशोक उईके, वाशिम : राधाकृष्ण विखे पाटील, छत्रपती संभाजीनगर : अतुल सावे, धाराशिव : जयकुमार गोरे, हिंगोली : मेघना बोर्डीकर, सातारा : शिवेंद्रराजे भोसले, कोल्हापूर : माधुरी मिसाळ.

## 'कधीकधी सर्व जिंकूनही माणूस हरतो!

### मी ही थांबतोय'; तुकाराम महाराजांचे वंशज शिरीष मोरेंची शेवटची चिठ्ठी

**| पिंपरी - चिंचवड | महाईन्यूज**

**"आयुष्यात तुम्हाला कधीच माझ्यामुळे मान खाली घालावी लागली नाही. मला घडवलं, पाठिशी तुम्ही उभं राहिलात, पण आता मी तुमच्यासोबत उभं राहणं गरजेचं असतानाच सोडून जातोय. कधीकधी सर्व जिंकूनही माणूस हरतो. मी ही थांबतोय", असं हभप शिरीष महाराज मृत्यूपूर्वी लिहिलेल्या पत्रात म्हणाले आहेत.**



जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांचे 11 वे वंशज शिरीष महाराज मोरे यांनी आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन स्वत:ला संपवलं आहे. त्यांच्या या टोकाच्या निर्णयामुळे देहू गावात शोककळा पसरली आहे. संबंधित वृत्त समोर आल्यानंतर संत तुकाराम महाराजांच्या वंशजांवर अशी वेळ का आली असावी? अशी चर्चा आता सर्वत्र सुरु आहे. हभप शिरीष महाराज मोरे यांनी मृत्यूपूर्वी पाच चिठ्ठ्या लिहिल्याची माहिती समोर आली आहे. यापैकी त्यांनी आई-वडील, बहीण आणि मित्रांना लिहिलेल्या चिठ्ठीतला मजकूर समोर आला आहे. त्यांच्या चिठ्ठीत मनाला चटका लावणारा मजकूर आहे.

### आई-वडिलांना लिहिलेल्या चिठ्ठीत काय

"प्रिय मम्मी-पप्पा आणि दिदी, आयुष्यात जे-जे करायचं म्हटलं त्या पाठिशी तुम्ही उभे राहिलात. जे मिळवण्यासाठी अनेक वर्ष लागतात, ते तुमच्या पाठिंब्याने काही वर्षातच मिळालं. आयुष्यात तुम्हाला कधीच माझ्यामुळे मान खाली घालावी लागली नाही. मला घडवलं, पाठिशी तुम्ही उभं राहिलात, पण आता मी तुमच्यासोबत उभं राहणं गरजेचं असतानाच सोडून जातोय. कधीकधी सर्व जिंकूनही माणूस हरतो. मी ही थांबतोय. यात सर्वस्वी दोष माझाच आहे. मला माफ करा", असं शिरीष मोरे आपल्या मृत्यूपूर्वी आई-वडिलांना उद्देशून लिहिलेल्या पत्रात म्हणाले आहेत.

शिरीष महाराजांनी कर्जामुळे स्वत:ला संपवल्याचं प्रथमदर्शनी समोर आलं आहे. पण या प्रकरणी देहू रोड पोलीस तपास करत आहेत.

# बनावट अध्यादेश काढून वेतनवाढ!

## लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून गुन्हा दाखल

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बनावट अध्यादेश काढून पुणे जिल्हा शिक्षण मंडळातील विविध माध्यमिक शाळांमधील ५० अपदवीधर कला शिक्षकांना पदवीधर वेतनश्रेणीचा लाभ मिळवून देण्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून, याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणी डॉ. दीपक चांदणे यांच्याविरुद्ध बंडगार्डन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे (एसीबी) पोलीस निरीक्षक अमोल भोसले यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. शिक्षण विभागाचे सचिव प्रविण मुंढे यांच्या नावाचा बनावट अध्यादेश काढण्यात आला. या प्रकाराची गंभीर दखल घेण्यात आली. या प्रकरणामध्ये डॉ. चांदणे याच्याबरोबरच अनेक जण सामील असावेत असा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. त्यादृष्टीने तपास करण्यात येत आहे. पुणे जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षणाधिकारी डॉ. भाऊसाहेब कारेकर यांना पैसे द्यायचे आहेत, असे सांगून डॉ. चांदणे यांनी शिक्षकांकडून १७ लाख रुपये गोळा केल्याचे प्राथमिक चौकशीत उघडकीस आले आहे.हा प्रकार पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या कार्यालयात १९ ऑक्टोबर २०२४ ते २७ डिसेंबर २०२४ दरम्यान घडला. त्याबाबत तक्रार मिळाल्यानंतर 'एसीबी'ने तपास केला. त्यानंतर याप्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला."एसीबी'तील अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या विविध माध्यमिक शाळांमधील 'एटीडी' पदविका मिळवलेल्या अपदवीधर कला शिक्षकांनी 'एएम' ही पदवी मिळवल्यानंतर वरिष्ठ पदवीधर वेतनश्रेणी लागू करण्याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाकडे दाखल करण्यात आला होता. डॉ. दीपक चांदणे यांनी आपली शिक्षण विभागामध्ये ओळख असल्याचे भासविले.

त्यांनी शासनाकडून आर्थिक लाभ मिळवून देण्याच्या हेतूने अन्य आरोपींच्या मदतीने शालेय शिक्षण आणि क्रीडा विभाग यांचे अतिरिक्त सचिव प्रविण मुंढे यांच्या डिजिटल स्वाक्षरीचा वापर करुन बनावट शासन निर्णय तयार केला. या बनावट शासन निर्णयाचा संदर्भ टाकून शिक्षणाधिकारी यांच्या बनावट सह्यांचा बनावट आदेश तयार केला. त्यासाठी डॉ. दीपक चांदणे याने शिक्षकांकडून एकूण १७ लाख रुपये गोळा केले.बनावट शासन निर्णय समाज माध्यमात प्रसारित झाला. शिक्षणाधिकारी डॉ. भाऊसाहेब कारेकर यांच्या निदर्शनास ही बाब आली. त्याची छाननी करण्यात आल्यानंतर संबंधित शासन निर्णय राज्य शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर कोठेही आढळून आलेला नाही. अतिरिक्त सचिव प्रविण मुंढे यांच्या बनावट स्वाक्षरीने हा खोटा आदेश काढण्यात आल्याची बाबही समोर आली. त्यानंतर डॉ. भाऊसाहेब कारेकर यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे गेल्या महिन्यात तक्रार केली होती. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने या शिक्षकांशी, मुख्याध्यापकांकडे चौकशी केली. त्यानंतर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीस उपअधीक्षक नीता मिसाळ याप्रकरणाचा तपास करत आहेत.

### गुन्हा दाखल करण्यात आला

या प्रकाराची गंभीर दखल घेण्यात आली. या प्रकरणामध्ये डॉ. चांदणे याच्याबरोबरच अनेक जण सामील असावेत असा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. त्यादृष्टीने तपास करण्यात येत आहे. पुणे जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षणाधिकारी डॉ. भाऊसाहेब कारेकर यांना पैसे द्यायचे आहेत, असे सांगून डॉ. चांदणे यांनी शिक्षकांकडून १७ लाख रुपये गोळा केल्याचे प्राथमिक चौकशीत उघडकीस आले आहे.हा प्रकार पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या कार्यालयात १९ ऑक्टोबर २०२४ ते २७ डिसेंबर २०२४ दरम्यान घडला. त्याबाबत तक्रार मिळाल्यानंतर 'एसीबी'ने तपास केला. त्यानंतर याप्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला."एसीबी'तील अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या विविध माध्यमिक शाळांमधील 'एटीडी' पदविका मिळवलेल्या अपदवीधर कला शिक्षकांनी 'एएम' ही पदवी मिळवल्यानंतर वरिष्ठ पदवीधर वेतनश्रेणी लागू करण्याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाकडे दाखल करण्यात आला होता.

# 'एसटी'चा प्रवास महागला, सुरक्षिततेचे काय?

## गंभीर अपघातांमध्ये वाढ ; दोन वर्षांत 301 अपघात, 35 जणांचा मृत्यू

।पुणे । वृत्तसंस्था : महाईन्यूज

**महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) प्रवासी शुल्कात वाढ करण्यात आल्याने सामान्य प्रवाशांचा प्रवास महागला आहे. मात्र, गेल्या दोन वर्षांतील अपघातांची सख्या पाहता प्रवासी असुरक्षित असल्याचे स्पष्ट झाले आहे. पुणे विभागांतर्गत मार्च २०२३ ते डिसेंबर २०२४ पर्यंत तब्बल ३०१ अपघात झाले असून, ३५ जणांचा मृत्यू झाला आहे.**




दोन वर्षांच्या तुलनेत गंभीर अपघातांमध्ये वाढ झाली असून मृत्युमुखी पडणाऱ्यांचे प्रमाणही वाढल्याचे समोर आले आहे. एसटी महामंडळाकडून २५ जानेवारीपासून प्रवासी शुल्कात १४.९५ टक्क्यांनी वाढ लागू केली आहे. मात्र सुरक्षिततेच्या उपाययोजनांबाबत हमी घेतली नसल्याचे दिसून येत आहे. आयुर्मान संपलेल्या बस ग्रामीण भागात चालविल्या जात आहेत. त्यामुळे द्रुतगती महामार्ग, राज्य मार्ग आणि शहरातील अंतर्गत रस्त्यांवर अपघातांचे प्रमाण वाढत आहे.

मार्च २०२३ ते डिसेंबर २०२४ या २१ महिन्यांमध्ये पुणे विभागातील बसचे ३०१ अपघात झाले आहेत. यामध्ये १५० अपघात गंभीर, तर १२६ अपघात किरकोळ आहेत.गंभीर अपघातांचे प्रमाण अधिक असून ३५ व्यक्तींचा मृत्यू झाला आहे. गंभीर अपघातांमध्ये देखील वाढ झाली असून २०२३ अखेरपर्यंत १७ मृत्यू झाले. २०२४ मध्ये गंभीर अपघातांमध्ये वाढ होऊन १८ जण मरण पावल्याचे एसटी महामंडळाच्या आकेडवारीवरून स्पष्ट झाले आहे.

### 150 अपघात गंभीर, तर 126 किरकोळ

बसच्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर चालकांची आरोग्य तपासणी, शिबिर आणि वेळोवेळी कौशल्य प्रशिक्षण देण्यात येत आहे. अपघात झाल्यानंतर संबंधित चालकांना नव्याने आठ ते दहा दिवस प्रशिक्षण देऊन चाचणी घेतली जाते. प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने वाहक आणि चालकांना सूचना करण्यात आल्या आहेत. लवकरच जुन्या बस सेवेतून काढून नवीन पर्यावरणपूरक बस विभागाच्या ताफ्यात टप्प्याटप्प्याने दाखल होणार आहेत.महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) प्रवासी शुल्कात वाढ करण्यात आल्याने सामान्य प्रवाशांचा प्रवास महागला आहे. मात्र, गेल्या दोन वर्षांतील अपघातांची सख्या पाहता प्रवासी असुरक्षित असल्याचे स्पष्ट झाले .

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा उद्या पिंपरी-चिंचवड दौरा

# महायुतीच्या सत्ताकाळात पिंपरी-चिंचवडच्या विकासाला गती!

### भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांची प्रतिक्रिया

। पिंपरी- चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात पिंपरी-चिंचवडमधील विकासकामे आणि प्रलंबित प्रकल्पांना खोडा घालण्याचे काम करण्यात आले. मात्र, महायुतीच्या सत्ताकाळामध्ये शहराच्या विकासाला गती मिळाली. पोलीस आयुक्तालयाच्या इमारतीचे भूमिपूजन होत आहे. ही पिंपरी-चिंचवडकरांसाठी निश्चितच समाधानाची बाब आहे, अशी प्रतिक्रिया भाजपाचे नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी दिली.**



पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने विविध विकासकामांचा उद्घाटन, भूमीपूजन तसेच उपक्रमांचा लोकार्पण सोहळा राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दि. ६ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी १२ वाजता जाधववाडी, चिखली येथील एमएनजीएल पंपासमोर आयोजित केला आहे.

या कार्यक्रमास केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या विशेष उपस्थितीत होणाऱ्या या कार्यक्रमास राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्यासह खासदार, आमदार आणि महापालिका अधिकारी, कर्मचारी उपस्थित राहणार आहेत.

#### या प्रकल्पांचे होणार लोकार्पण

लोकार्पण होणाऱ्या विकासका उपक्रमांमध्ये स्मार्ट सिटीच्या वतीने GIS ENABLED ERP अंतर्गत CORE APPLICATION (SAP), NON-CORE APPLICATION, E-OFFICE (DMS) आणि भौगोलिक माहिती प्रणाली (GIS) मध्ये विकसित केलेली संगणक प्रणाली तसेच चिंचवड येथील तालेरा रुग्णालयाची नवीन इमारत, शहरातील विविध ठिकाणी टाकाऊपासून टिकाऊ (वेस्ट टू वंडर) वस्तूंपासून निर्मिती केलेल्या टिकाऊ कलाकृती, महापालिकेच्या विविध प्रशासकीय इमारतींवर बसविण्यात आलेले रुफ टॉप सोलर सिस्टीम (सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प), सिटी हब फॉर डेटा कम्युनिकेशन (CHDC) उपक्रम, AI DRIVEN HOARDING DETECTION AND SURVEILLANCE SYSTEM उपक्रम यांचा समावेश आहे.

#### ...या प्रकल्पांचे होणार भूमिपूजन

भूमीपूजन होणाऱ्या प्रकल्पांमध्ये पिंपरी येथील सुविधा भुखंडावर उभारण्यात येणारे मध्यवर्ती अग्निशमन केंद्र आणि अग्निशमन प्रबोधिनी इमारत, आकुर्डी प्राधिकरण येथील डॉ. हेडगेवार भवन जवळ उभारण्यात येणारे अग्निशमन केंद्र, मधुबन हॉटेल ते इंदिरा रोड (२४ मीटर डी.पी रस्ता) व सिल्वर स्पून हॉटेल ते इंदिरा रोड (१८ मीटर डी.पी रस्ता) तसेच या दोन्ही रस्त्यांना जोडणाऱ्या वाकड शिवेपर्यंतचा १८ मीटर रुंदीच्या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण तसेच पवना नदीवरील मामुर्डी ते सांगवडे दरम्यान जोडणारा पूल या विकासकामांचा समावेश आहे.

> " पिंपरी-चिंचवड स्वतंत्र पोलीस आयुक्तालयासाठी 2017 मध्ये पिंपरी-चिंचवडकरांना शब्द दिला होता. राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली 2018 मध्ये पोलीस आयुक्तालयाचे कामकाज सुरू झाले. आयुक्तालयासाठी हक्काची जागा मिळण्याबाबत पुन्हा पाठपुरावा केला. त्यालाही महायुती सरकारच्या काळात मंजुरी मिळाली. पिंपरी-चिंचवड शहराच्या प्रगतीशील वाटचालीमध्ये मैलाचा दगड असलेल्या या ऐतिहासिक वास्तुची पायाभरणी होत आहे. याचे मनोमन समाधान वाटते.
>
> **– महेश लांडगे,**
> आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

## हाऊसिंग सोसायटी सदस्यांनी गिरवले कायद्याचे धडे!

### गृहनिर्माण सोसायटी कायदा जागृती: हाऊसिंग सोसायटी महासंघाच्या पुढाकारातून प्रशिक्षण

। पिंपरी- चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**गृहनिर्माण संस्था, किचकट प्रक्रिया, नव्या अटी शर्ती नवे बदल यांची माहिती गृहनिर्माण संस्था हाऊसिंग सोसायटी सदस्य यांना व्हावी या विधायक हेतूने पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी महासंघाच्या पुढाकारातून प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिरातून हाऊसिंग सोसायटीच्या सदस्यांनी कायद्याचे धडे गिरवले.**






सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या व्यवस्थापकीय समित्यांचे चे सदस्य तसेच व्यवस्थापक महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यातील तरतुदीनुसार प्रशिक्षण घेणे अनिवार्य आहे. ही बाब लक्षात घेऊन पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी महासंघाने पुढाकार घेतला. १ व २ फेब्रुवारी रोजी हॉटेल ॲंबियन्स, वाकड येथे १२० सोसायट्यांचे १६० कार्यकारिणी सदस्य, व्यवस्थापकांनी सहभाग नोंदविला.

ॲड. सत्या मुळे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. ॲड कणाद लहाने, ॲड अंजली कलंत्रे , चार्टर्ड अकाउंट्ट विनायक दौंडकर, काशीनाथ दंडवते, सहकार निवडणूक अधिकारी संजय नेवसे यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी फेडरेशनचे सर्व कमिटी सदस्य, कस्पटे वस्ती ज्येष्ठ नागरिक संघाच्या रिटा वासवानी, अरुणा लकडे, जयश्री निकूंभ यांचे सहकार्य लाभले. माजी नगरसेवक संदीप कस्पटे यांनी सहाय्य केले. पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष दत्तात्रय देशमुख यांनी आभार मानले.

#### सोसायटी कामकाज आणि कायदा मार्गदर्शन..

दोन दिवस चाललेल्या या कार्यक्रमात हाऊसिंग सोसाट्यांच्या कामकाज कायद्याच्या चौकटीत राहून कसे पार पाडावे या संबंधी प्रशिक्षण देण्यात आले. सोसायटयांची खाते पुस्तके-रेकॉर्ड कसे ठेवायचे, मासिक सभा व अन्य सभा यांचे कामकाज कसे चालवायचे, शेअर सर्टिफिकेट्स, सोसायटी बाय लॉज, मेंटेनन्स शुल्क, निधी संकलन व गुंतवणूक इत्यादी अनेक विषयांवर तज्ञ मंडळीनी प्रशिक्षण दिले.

## कळकळीचे नामस्मरण



आम्ही सुस्थितीत असलो म्हणजे आमचे नामस्मरण अधिक होते. त्यात काही बिघाड झाला की तिकडेच सारे लक्ष वेधते. याला कारण म्हणजे आमचे स्मरण हे वरवरचे असते. श्रद्धेने नामस्मरण करणे आपल्याला कठीण जाते. परमात्म्याशिवाय आपले कोणी नाही असा दृढ निश्चय अगर श्रद्धा असणे आवश्यक आहे. म्हणजे मग प्रकृतीत काही बिघाड झाला तरी आपले स्मरण टिकून राहील. द्रौपदीला आता आपला कोणी त्राता नाही असे वाटून जेव्हा तिने श्रीकृष्णाचा धावा केला, तेव्हा भगवान् लगेच धावून आले. असे खऱ्या कळकळीचे स्मरण आपले असायला पाहिजे. जसे लहान मूल काहीही झाले तरी आपल्या आईलाच हाक मारते, दुसरे तिसरे कोणी जाणत नाही, तसे आपले परमेश्वर-स्मरणाच्या बाबतीत झाले पाहिजे. आपली भिस्त खरोखर कोणावर आहे हे संकटकाळीच उत्तम कळते. नामस्मरणाच्या पायऱ्या अशा सांगता येतील - पहिली, सुस्थितीतले वरवरचे स्मरण; दुसरी, परमात्म्याशिवाय आपले कोणी नाही ही जाणीव होऊन, संकटसमयी त्याचे स्मरण; आणि तिसरी, हीच जाणीव दृढ होऊन पुढे अखंड होणारे नामस्मरण. यांपैकी वरवर स्मरण करणारा 'आम्हांला संकटेच नकोत' असे म्हणतो, तर साधुसंत 'आम्हांला संकटे येऊ देत' असे भगवंताजवळ मागतात, कारण त्यावेळेसच त्याचे खरे स्मरण होते. आपण स्वत: आहोत याची आपल्याला आज जितकी खात्री आहे, तितकी खात्री भगवंत आहे अशी झाली पाहिजे. परमात्मा सर्व ठिकाणी आहे की कल्पना केव्हा तरी आपल्याला होते खरी, पण ती कायम न राहिल्यामुळे दृढपणे आपल्या आचरणात येत नाही; आपली वृत्ती तशी झाली की ती आपल्या आचरणात येईल. भगवंत हा कर्ता आहे अशी आपली दृढ भावना झाली की आपण प्रत्येक गोष्ट त्याला सांगत बसणार नाही, 'भगवंताला माझे सर्व कळते' असे जर खरेच वाटले तर त्याला आवडेल असेच आपण वागू. पहाटे उठावे आणि भगवंताची मूर्ती डोळ्यांसमोर आणून प्रार्थना करावी, आणि "तुझे विस्मरण जिथे होते, तिथे मला जागृत करीत जावे; नाही मला आता तुझ्याशिवाय आसरा," असे म्हणून त्याला मन:पूर्वक नमस्कार करावा. मनुष्य कसाही असला तरी भगवंताच्या स्मरणात त्याला समाधान खात्रीने मिळेल. जो भगवंताचा झाला त्याला जगण्याचा कंटाळा कधीच येणार नाही. विषयाचा आनंद हा दारूसारखा आहे; ती धुंदी उतरल्यावर मनुष्य जास्त दु:खी बनतो. 'मी भगवंताचा आहे' या भावनेने जो राहील त्यालाच खरा आनंद भोगता येईल.

**बोधवचन:- भोग व दुःख यांत वेळ न घालविता भगवंताकडे लक्ष दिले पाहिजे.**



**'स्टेट'मेंट**

**अधिकराव दिवे-पाटील**
संस्थापक, संपादक

# वाढीव मतदानाचा कीडा, अजून वळवळतोय !

**विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात मतदानाची संख्या वाढली, आणि त्यामुळेच 'महायुती' चा दणदणीत विजय झाला, हा डोक्यात शिरलेला कीडा अजूनही वळवळतोच आहे. उबाठा गटाचे नेते संजय राऊत आणि काँग्रेसचे नेते नाना पटोले त्यांनी पहिल्यांदा या वाढलेल्या मतदार संख्येवर आणि टक्केवारीवर शंका व्यक्त केली..न्यायालयात धाव घेतली. लोकसभेमध्ये गेल्या आठवड्यात हाच मुद्दा काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी उपस्थित केला, आणि एकूण 76 लाख मतदार कसे वाढले? याचा हिशोबच सरकारकडे मागितला.**



हिशेब मागा, वातावरण स्वच्छ आहे ज्यांनी भारतीय जनता पक्षाला जवळून अनुभवलं आहे, त्यांना माहित आहे की प्रत्येक निवडणुकीपूर्वी जास्तीत जास्त मतदार नोंदणी करण्याचा एक मोठा कार्यक्रम संघ परिवार आणि भाजपातर्फे हाती घेतला जातो. अशा प्रकारच्या कार्यक्रमाशी उबाठा गट किंवा काँग्रेसचा काडीचाही संबंध नसतो, यामुळे विधानसभेपूर्वी बऱ्यापैकी मतदार वाढलेले होते, हे वेगळे सांगायला नको! दुसरा मुद्दा मतदान केंद्रावर मतदान संपण्यापूर्वी चे पोहोचले वेळ असतात त्या सर्वांचे मतदान करून घेतले जाते. यावेळी हा आकडा प्रचंड होता, काही ठिकाणी तर मतदान संपण्यासाठी रात्रीचे दहा वाजून गेले, हे विरोधकांना कोण सांगणार ?

### पराभवाचे खापर फोडा 'ईव्हीएम' वर

पराभव झाला की त्याचे खापर ईव्हीएम वर फोडण्याचा जुना पायंडा संजय राऊत आणि नाना पटोले यांनी यावेळीही सुरू ठेवला. त्याचबरोबर त्यांनी दुसरा मुद्दा उकरून काढला तो म्हणजे डोक्यात वळवळणारा वाढीव मतदानाचा कीडा ! निवडणूक आयोगाकडे वेळोवेळी तक्रार करू नये, आयोगाने या मंडळींचे प्रत्येक गोष्टीत थोबाड फोडले आहे, पण डोक्यातील कीडा काही गप्प बसू देत नाही. पुन्हा एकदा नव्याने हा मुद्दा त्यांनी चव्हाट्यावर मांडला आहे, कोर्टानेही तो गांभीर्याने घेतला आहे. पण, यावेळी उत्तर वेगळेच मिळणार आहे आणि वाढीव मतदारांचे समर्थन केले जाणार आहे, हे सूज्ञानी लिहून ठेवावे.

### राहुल गांधी यांचा थयथयाट

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालावर लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पुन्हा प्रश्न उपस्थित केला आहे. लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडीला यश मिळाले आणि सहा महिन्यांनी झालेल्या विधानसभा निवडणुकीत अचानक ७० लाख मतदार कसे वाढले, असा प्रश्न त्यांनी लोकसभेत विचारला आहे. दि. ४ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीला आव्हान देणारी याचिका कोर्टात दाखल करण्यात आली आहे. वंचित बहुजन आघाडीचे प्रतिनिधी चेतन अहिरे यांची रीट याचिका मुंबई उच्च न्यायालयाने स्वीकारली आहे. भारतीय संघ, भारतीय निवडणूक आयोग, महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी या याचिकेतील प्रतिवादी आहेत. महाराष्ट्रात गत पाच वर्षांत मतदारांची संख्या ३२ लाखांनी वाढली, मग लोकसभा निवडणुकीनंतर केवळ सहा महिन्यांत मतदारांची संख्या ४८ लाखांनी कशी वाढली असा प्रश्न काँग्रेसने उपस्थित केला आहे. राष्ट्रीय मतदान दिनानिमित्त काँग्रेसने पुन्हा एकदा मतदारयादीत त्रुटी असल्याची टीका केली आहे. तसेच आघाडीच्या १०० पराभूत उमेदवारांनी या संदर्भात विविध न्यायालयांत याचिका दाखल केल्या आहेत. विधानसभा निवडणुकीत सहा वाजल्यानंतर सुमारे ७५ लाख मतदारांनी मतदान केले. परंतु प्रत्यक्ष मतदान आणि मिळालेली मते यात मोठी तफावत असल्याचा दावा करून ही निवडणूक रद्दबातल घोषित करण्याच्या मागणीसाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. न्यायालयाने या याचिकेची दखल घेऊन केंद्रीय मुख्य निवडणूक आयोग आणि राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांना नोटीस बजावली आणि भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले.

### पुढील सुनावणी 17 फेब्रुवारीला

अहिरे यांनी दाखल केलेल्या याचिकेवर पुढील सुनावणी १७ फेब्रुवारी रोजी होणार आहे. निवडणूक प्रक्रियेत अनियमितता झाली, सायंकाळी सहानंतर झालेल्या मतदानातील घोळ, त्याबाबतची कागदपत्रे आणि सीसीटीव्ही फुटेज देण्यास निवडणूक आयोगाने दिलेला नकार आदी मुद्दे या याचिकेत उपस्थित करण्यात आले आहेत.

### राहुल गांधी यांची शंका रास्तच

निवडणूक आयुक्तांची निवड पंतप्रधान, विरोधी पक्षनेते आणि सरन्यायाधीशांच्या समितीमार्फत केली जायची. पण आता सरन्यायाधीशांना समितीमधून का हटवण्यात आले असा सवाल राहुल गांधी यांनी केला. आता पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि विरोधी पक्षनेता समितीमध्ये आहेत. मोदी आणि शहा बहुमताने निर्णय घेणार आणि विरोधी पक्षनेत्याला त्यांचा निर्णय मान्य करावा लागणार. सरन्यायाधीश सदस्य असते तर समितीमध्ये सविस्तर चर्चा झाली असती. त्यामुळे समितीच्या बैठकीला विरोधी पक्षनेत्याने जायचे कशाला, हा राहुल गांधी यांना पडलेला प्रश्न रास्तच म्हणावा लागेल.

**राज्याचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज** चव्हाण यांनी निवडणूक आयोगावर निशाणा साधताना निवडणूक आयोगाने वाढवलेल्या मतदारांमुळे महायुतीचा विजय झाल्याचा आरोप केला. चव्हाण म्हणाले, गत पाच वर्षांत ३२ लाख मतदारांची संख्या वाढली आहे. विधानसभा निवडणुकीतही ती वाढली, याचाच अर्थ 'गोलमाल है भाई गोलमाल है !' हे पृथ्वीराज चव्हाण यांचे उद्गार काँग्रेसची भूमिका स्पष्ट करतात.

### लोकसभेवेळी सगळे ठीक होते का ?

थोडक्यात, एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी की सध्या कॉम्प्युटरचे युग आहे सर्व घटना आणि उलाढाली पारदर्शक होत असतात. विरोधकांना पराभव झाला की मतदार संख्या आणि ईव्हीएम दिसते. आक्षेप घ्यायचा होतासच तर लोकसभा निवडणुकीनंतर का घेतला गेला नाही ? त्यावेळी पण मतदान वाढले होते..आणि जो आक्षेप पूर्ण महाराष्ट्रासाठी घेत आहात, तो बारामतीसाठी का घेत नाही ?

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# सुरेश धस म्हणजे आधुनिक भगीरथ!

## देवेंद्र फडणवीस : एकदा सुरेश धस मागे लागले की डोकं खाऊन टाकतात

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या करण्यात आली. डिसेंबर महिन्यातली ही घटना घडून दोन महिने पूर्ण होण्यास आले आहेत. दरम्यान भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी हा प्रश्न लावून धरला आहे. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिलं होतं. तसंच दोनदा या सगळ्या प्रकरणात अजित पवारांची भेट घेतली होती. दरम्यान बीडच्या आष्टीमध्ये देवेंद्र फडणवीस यांची उपस्थिती होती. देवेंद्र फडणवीस यांनी सुरेश धस यांचा विशेष उल्लेख केला. सुरेश धस यांना त्यांनी आधुनिक भगीरथाची उपमा दिली. तसंच एकदा सुरेश धस मागे लागले की डोकं खाऊन टाकतात असंही मुख्यमंत्री म्हणाले.**




### माझ्यावर जलसिंचनची जबाबदारी

" "मी माझे भाग्य समजतो पुन्हा माझ्यावर जलसिंचनची जबाबदारी आली. या प्रकल्पाचे सगळे अडथळे दूर केले. असंही देवेंद्र फडणवीस म्हणाले. तसंच सुरेश धस यांचा उल्लेख आधुनिक भगीरथ असा केला.देवेंद्र फडणवीस सुरेश धस यांच्याबाबत म्हणाले, "सुरेश धस हे आधुनिक भगीरथ असून ते एकदा मागे लागले तर डोकं खाऊन टाकतात." असं वक्तव्य राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. " बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या करण्यात आली. डिसेंबर महिन्यातली ही घटना घडून दोन महिने पूर्ण होण्यास आले आहेत. दरम्यान भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी हा प्रश्न लावून धरला आहे. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिलं होतं.

मराठवाड्याला कृष्णा खोरेचे पाणी मिळाले पाहिजे यासाठी गोपीनाथ मुंडे आणि मराठवाड्यातील अनेक नेत्यांनी केला. पण दुर्दैवाने ते सगळे काम पूर्ण झाले नाही. २३ टीएमसी पाण्यापैकी केवळ सात टीएमसी पाणी सापडले. या भागाचा दुष्काळ आता भूतकाळ होणार आहे. जो पर्यंत पश्चिमी वाहिन्यांचे पाणी, थेट समुद्रात जाणारे पाणी गोदावरीमध्ये आणीत नाहीत तोपर्यंत मराठवाडा दुष्काळ मुक्त होणार नाही. त्यासाठी गोदावरीच्या एकात्मिक आराखडा बनवला आहे. त्या माध्यमातून ५३ टीएमसी पाणी गोदावरीच्या खोऱ्यात आले पाहिजे." "मी माझे भाग्य समजतो पुन्हा माझ्यावर जलसिंचनची जबाबदारी आली. या प्रकल्पाचे सगळे अडथळे दूर केले.

असंही देवेंद्र फडणवीस म्हणाले. तसंच सुरेश धस यांचा उल्लेख आधुनिक भगीरथ असा केला.देवेंद्र फडणवीस सुरेश धस यांच्याबाबत म्हणाले, "सुरेश धस हे आधुनिक भगीरथ असून ते एकदा मागे लागले तर डोकं खाऊन टाकतात." असं वक्तव्य राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. "महायुतीचं सरकार असताना त्यांनी मराठवाड्याचा पाणी प्रश्न सोडवण्यासाठी मेहनत घेतली" असं सांगत फडणवीसांनी सुरेश धस यांचे कौतुक केलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आष्टी येथील कुंटेफळ साठवण तलावाचे भूमिपूजन करण्यात आलं. त्या कार्यक्रमात देवेंद्र फडणवीस बोलत होते. या तलावामुळे दुष्काळी आष्टी तालुक्यातील सिंचनाचा प्रश्न मार्गी लागणार आहे.आमदार सुरेश धस यांनी देवेंद्र फडणवीसांचा उल्लेख देवेंद्र बाहुबली असा केला. आमदार सुरेश धस यांच्याकडून भरसभेत फडणवीसांवर कौतुकाचा वर्षाव करण्यात आला.

बाकी कोणाकडून अपेक्षा नाही, पण देवेंद्र फडणवीसांकडून अपेक्षा आहे असं सुरेश धस म्हणाले. दरम्यान संतोष देशमुख यांच्या खुनाच्या प्रकरणात सगळ्यांवर कारवाई होणार. या ठिकाणी सगळ्यांना गुण्या गोविंदाने राहायचे आहे. आपण नवीन बीड तयार करू असंही देवेंद्र फडणवीस त्यांच्या भाषणात म्हणाले.मराठवाड्याला कृष्णा खोरेचे पाणी मिळाले पाहिजे यासाठी गोपीनाथ मुंडे आणि मराठवाड्यातील अनेक नेत्यांनी केला. पण दुर्दैवाने ते सगळे काम पूर्ण झाले नाही. २३ टीएमसी पाण्यापैकी केवळ सात टीएमसी पाणी सापडले. या भागाचा दुष्काळ आता भूतकाळ होणार आहे. त्यासाठी गोदावरीच्या एकात्मिक आराखडा बनवला आहे. त्या माध्यमातून ५३ टीएमसी पाणी गोदावरीच्या खोऱ्यात आले पाहिजे.

# 'ज्ञानसंपादनासाठी वाचनकक्षा रुंदावणे गरजेचे'

## उपसभापती डॉ. गोऱ्हे : मुंबई शहर जिल्हा ग्रंथोत्सवाचे उद्घाटन

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**युवा पिढीमध्ये वाचन संस्कृती वाढीस लागली पाहिजे. वाचनातून प्रगल्भता येते. विविध विषयांतील माहिती व ज्ञान मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांनी आपली वाचनकक्षा रुंदावी, असे आवाहन विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ नीलम गोऱ्हे यांनी केले.**




### चांगल्या लेखनाचा अनुभव घ्या

मात्र काय वाचावे आणि काय बघावे यावर मुला-मुलींनी नियंत्रण ठेवावे. केवळ मोबाईलवर गुंतून न राहता रोज काहीतरी वाचन करावे, तरच लेखनामध्ये प्रगती होते. दुसऱ्याचे ऐकून घ्यायला शिकले पाहिजे. समाजमाध्यमावर व्यक्त होताना कायद्याच्या चौकटीत राहून लिहिण्याचा प्रयत्न करा नवीन लेखक तयार होत आहेत चांगल्या लेखनाचा अनुभव घ्या, असेही डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय आणि इमारत दुरुस्ती पुनर्विकासासाठी निधीचा प्रस्ताव पाठवण्याबाबतही डॉ गोऱ्हे यांनी सूचना केल्या.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे ग्रंथालय संचालनालय, मुंबई शहरचे जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय आणि मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय यांच्या संयुक्त विद्यमाने दादर येथे आयोजित मुंबई शहर ग्रंथोत्सव २०२४ ' कार्यक्रमात डॉ. गोऱ्हे बोलत होत्या. यावेळी उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत आणि डॉ गोऱ्हे यांच्या हस्ते फीत कापून ग्रंथोत्सवाचे उद्घाटन झाले. प्रभारी ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, जिल्हा ग्रंथालय अधिकारी शशिकांत काकड, साहित्यिक व ज्येष्ठ पत्रकार श्रीकांत बोजेवार, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या कार्याध्यक्ष पत्रकार शीतल करदेकर, कार्यवाह रवींद्र गावडे आदींसह विद्यार्थी उपस्थित होते. समाजमाध्यमावर व्यक्त होताना कायद्याच्या चौकटीत राहून लिहिण्याचा प्रयत्न करा नवीन लेखक तयार होत आहेत चांगल्या लेखनाचा अनुभव घ्या, असेही डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय आणि इमारत दुरुस्ती पुनर्विकासासाठी निधीचा प्रस्ताव पाठवण्याबाबतही डॉ गोऱ्हे यांनी सूचना केल्या. उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे म्हणाल्या की, प्रत्येकाला मनासारखे वाचता येण्यासाठी स्वातंत्र्य हवे.मात्र काय वाचावे आणि काय बघावे यावर मुला-मुलींनी नियंत्रण ठेवावे. केवळ मोबाईलवर गुंतून न राहता रोज काहीतरी वाचन करावे, तरच लेखनामध्ये प्रगती होते.

# मायदेशी परतलेल्या स्थलांतरितांची चौकशी

## अमेरिकेचे विमान अमृतसरच्या विमानतळावर दाखल

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिकेतून १०४ बेकायदा भारतीय स्थलांतरितांना घेऊन आलेले अमेरिकेचे लष्करी विमान अमृतसरच्या श्री गुरू रामदासजी आंतरराष्ट्रीय विमानतळावर बुधवारी दुपारी उतरले अशी माहिती सूत्रांनी दिली. यापैकी ३० स्थलांतरित पंजाबचे, हरियाणा व गुजरातचे प्रत्येकी ३३, तसेच महाराष्ट्र व उत्तर प्रदेशचे प्रत्येकी तीन आणि चंडीगडचे दोन आहेत आहेत असेही सूत्रांनी सांगितले. मात्र, आलेल्या स्थलांतरितांच्या संख्येबद्दल अधिकृत माहिती मिळाली नाही.**



यापूर्वीच्या वृत्तांमध्ये अमेरिकेचे सी-१७ हे लष्करी विमान २०५ बेकायदा स्थलांतरितांना घेऊन येत असल्याचे सांगण्यात आले होते. मात्र, सूत्रांनी पीटीआयला दिलेल्या माहितीनुसार बुधवारी आलेल्या विमानातून १०४ बेकायदा स्थलांतरित परत पाठवण्यात आले आहेत. स्थलांतरितांमध्ये १९ महिला आणि १३ अल्पवयीन मुलांचा समावेश आहे.बुधवारी दुपारी १.५५ वाजता अमेरिकेचे विमान अमृतसरला उतरले. विमानतळाबाहेर मोठ्या प्रमाणात बॅरिकेड उभारण्यात आले होते तसेच मोठ्या संख्येने पोलीस तैनात होते. अमेरिकी सरकारने भारतात परत पाठवलेला बेकायदा स्थलांतरितांचा हा पहिला गट आहे. त्यांची पडताळणी केल्यावर आणि पार्श्वभूमी तपासल्यानंतर त्यांना घरी जाऊ देण्याची अपेक्षा आहे असेही सूत्रांनी सांगितले. सर्व स्थलांतरितांची पंजाब पोलिसांसह निरनिराळ्या सरकारी संस्थांकडून चौकशी करण्यात येत आहे. कोणाच्या विरोधात गुन्हा दाखल आहे का हे तपासले जात आहे. काही जणांच्या कुटुंबीयांनी सांगितले की त्यांनी जमिनी विकून आणि २०-२५ लाखांचे कर्ज घेऊन घरातील तरुण मुलांना उज्वल भविष्यासाठी अमेरिकेत पाठवले होते. स्थलांतरितांना परत पाठवण्याच्या अमेरिकेच्या निर्णयाबद्दल पंजाबचे अनिवासी भारतीय विषयक खात्याचे मंत्री कुलदीपसिंग धालिवाल यांनी मंगळवारी नाराजी व्यक्त केली. नवी दिल्ली : अमेरिकेतून परत पाठवल्या जाणाऱ्या भारतीयांच्या हातात बेड्या घातल्याचे आणि त्यांना अवमानास्पद वागणूक दिल्याचे चित्र दु:खदायक आहे अशी प्रतिक्रिया काँग्रेसने बुधवारी व्यक्त केली.

यूपीए सरकारच्या काळात भारतीय राजनैतिक अधिकारी देवयानी खोब्रागडे यांना देण्यात आलेल्या अपमानास्पद वागणुकीनंतर अमेरिकेला खेद व्यक्त करावा लागला होता याची आठवणही काँग्रेसच्या माध्यम व प्रसिद्धी विभागाचे प्रमुख पवन खेरा यांनी करून दिली. काँग्रेस खासदार शशी थरूर यांनीही मंगळवारी स्थलांतरितांना नागरी विमानाने न पाठवता लष्करी विमानाने पाठवल्याबद्दल टीका केली होती. डिसेंबर २०१३मध्ये भारतीय राजनैतिक अधिकारी देवयानी खोब्रागडे यांना अमेरिकेत बेड्या घातल्या होत्या आणि त्यांची शारीरिक झडती घेण्यात आली होती. त्यावेळी परराष्ट्र सचिव सुजाता सिंह यांनी अमेरिकेच्या राजदूत नॅन्सी पॉवेल यांच्याकडे कठोर शब्दांमध्ये निषेध केला होता.यापूर्वीच्या वृत्तांमध्ये अमेरिकेचे सी-१७ हे लष्करी विमान २०५ बेकायदा स्थलांतरितांना घेऊन येत असल्याचे सांगण्यात आले होते. मात्र, सूत्रांनी पीटीआयला दिलेल्या माहितीनुसार बुधवारी आलेल्या विमानातून १०४ बेकायदा स्थलांतरित परत पाठवण्यात आले आहेत. स्थलांतरितांमध्ये १९ महिला आणि १३ अल्पवयीन मुलांचा समावेश आहे.बुधवारी दुपारी १.५५ वाजता अमेरिकेचे विमान अमृतसरला उतरले. विमानतळाबाहेर मोठ्या प्रमाणात बॅरिकेड उभारण्यात आले होते तसेच मोठ्या संख्येने पोलीस तैनात होते. अमेरिकी सरकारने भारतात परत पाठवलेला बेकायदा स्थलांतरितांचा हा पहिला गट आहे.

### हातात बेड्या : अवमानास्पद वागणूक

सर्व स्थलांतरितांची पंजाब पोलिसांसह निरनिराळ्या सरकारी संस्थांकडून चौकशी करण्यात येत आहे. कोणाच्या विरोधात गुन्हा दाखल आहे का हे तपासले जात आहे. काही जणांच्या कुटुंबीयांनी सांगितले की त्यांनी जमिनी विकून आणि २०-२५ लाखांचे कर्ज घेऊन घरातील तरुण मुलांना उज्ज्वल भविष्यासाठी अमेरिकेत पाठवले होते. स्थलांतरितांना परत पाठवण्याच्या अमेरिकेच्या निर्णयाबद्दल पंजाबचे अनिवासी भारतीय विषयक खात्याचे मंत्री कुलदीपसिंग धालिवाल यांनी मंगळवारी नाराजी व्यक्त केली भारतीयांच्या हातात बेड्या घातल्याचे आणि त्यांना अवमानास्पद वागणूक दिल्याचे चित्र दु:खदायक आहे अशी प्रतिक्रिया काँग्रेसने बुधवारी व्यक्त केली. यूपीए सरकारच्या काळात भारतीय राजनैतिक अधिकारी देवयानी खोब्रागडे यांना देण्यात आलेल्या अपमानास्पद वागणुकीनंतर अमेरिकेला खेद व्यक्त करावा लागला होता याची आठवणी काँग्रेसच्या माध्यम व प्रसिद्धी विभागाचे प्रमुख पवन खेरा यांनी करून दिली. काँग्रेस खासदार शशी थरूर यांनीही मंगळवारी स्थलांतरितांना नागरी विमानाने न पाठवता लष्करी विमानाने पाठवल्याबद्दल टीका केली होती.

# मेक इन इंडियाबाबत राहुल गांधींचा सल्ला

## भारतीय कंपन्यांनी त्यांची उत्पादने भारतामध्ये तयार करावीत

। प्रयागराज ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी बुधवारी मेक इन इंडियाचा दाखला देत पंतप्रधान नरेंद्र मोदींवर जोरदार टीका केली आहे. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दिलेल्या उत्तराला राहुल गांधी यांनी लक्ष्य करत एक्सवर एक पोस्ट केली आहे. त्यामध्ये म्हटले की, "पंतप्रधानांनी हे मान्य करावे की मेक इन इंडिया हा एक चांगला उपक्रम असूनही पूर्णपणे अपयशी ठरला आहे.**

२०१४ मध्ये उत्पादन क्षेत्राचा जीडीपीमध्ये १५.३% वाटा होता, तो १२.६% पर्यंत घसरला. जे गेल्या ६० वर्षातील सर्वात कमी आहे.तरुणांच्या रोजगाराचा मुद्दा उपस्थित करताना काँग्रेस खासदार राहुल गांधी म्हणाले, "भारतातील तरुणांना नोकऱ्यांची नितांत गरज आहे. अलिकडच्या काळात कोणतेही सरकार, यूपीए असो की एनडीए, या राष्ट्रीय आव्हानाला तोंड देऊ शकलेले नाही. आपल्या उत्पादन क्षेत्राला मागे टाकणाऱ्या गोष्टींना तोंड देण्यासाठी आणि भविष्यातील जागतिक अर्थव्यवस्थेत स्पर्धात्मक होण्यासाठी आपल्याला दूरदृष्टीची



आवश्यकता आहे."काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी एक्सवर लिहिले आहे की, "भारतातील उत्पादनाच्या दृष्टिकोनातून इलेक्ट्रिक मोटर्स, बॅटरी, ऑप्टिक्स आणि एआय सारख्या उदयोन्मुख तंत्रज्ञानावर विशेष लक्ष दिले पाहिजे. आपल्या उत्पादन क्षेत्राला पुनरुज्जीवित करण्याचा, अत्याधुनिक उत्पादन क्षमता विकसित करण्याचा आणि आपल्याला आवश्यक असलेल्या नोकऱ्या निर्माण करण्याचा हा एकमेव मार्ग आहे. चीन आपल्यापेक्षा १० वर्षे पुढे आहे आणि त्यांच्याकडे एक मजबूत औद्योगिक व्यवस्था आहे. यामुळेच ते आपल्याला आव्हान देण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्याशी प्रभावीपणे स्पर्धा करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे आपली स्वतःची उत्पादन प्रणाली तयार करणे आणि त्यासाठी आपल्याला दूरदृष्टी आणि रणनीतीची आवश्यक आहे."

### काय आहे मेक इन इंडिया?


केंद्र सरकारने २५ सप्टेंबर २०१४ मध्ये मेक इन इंडिया ही योजना जाहीर केली होती. या योजनेमागील महत्त्वाचा हेतू, बहुराष्ट्रीय तसेच भारतीय कंपन्यांनी त्यांची उत्पादने भारतामध्ये तयार करावीत, असा होता. ही योजना उद्योजकतेला चालना देण्याकरिता तसेच फक्त वस्तूनिर्माणच नव्हे, तर संबंधित पायाभूत सुविधा क्षेत्र आणि सेवा क्षेत्र यांमध्येदेखील उद्योजकतेला चालना देणे या उद्देशाने सुरू करण्यात आली आहे. राहुल गांधी यांनी बुधवारी मेक इन इंडियाचा दाखला देत पंतप्रधान नरेंद्र मोदींवर जोरदार टीका केली आहे.

# श्रेया घोषालच्या लग्नातील फोटो पाहिलेत का?



बॉलीवूडमधील प्रसिद्ध गायिका श्रेया घोषाल कायम तिच्या गाण्यांमुळे चर्चेत असते. विविध चित्रपटांसाठी तिने गायलेली अनेक गाणी सुपरहिट झाली आहेत. श्रेयाचा आज लग्नाचा वाढदिवस आहे. ५ फेब्रुवारी २०१५ रोजी तिने शिलादित्य मुखोपाध्यायबरोबर लग्न केलं. या दोघांच्या लग्नाला आता १० वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यानिमित्त श्रेयाने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे.पतीला लग्नाच्या दहाव्या वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना श्रेयाने सोशल मीडियावर तिचे आणि तिच्या पतीचे लग्नातील काही सुंदर फोटो पोस्ट केलेत. दहा वर्षे जुने फोटो पोस्ट करून तिने तिच्या जुन्या आठवणींना पुन्हा एकदा उजाळा दिला आहे.

# जॉन अभिनेता नसता तर मेकॅनिक असता



अभिषेक बच्चन आणि जॉन अब्राहमची मैत्री कोणापासूनही लपलेली नाही. अभिषेकने जॉनबद्दल बोलताना, तो अभिनेता नसून मेकॅनिक व्हायला हवा होता, असे म्हटले आहे. त्याला बाइक्सची खूप आवड आहे. बाईक चालवण्याबरोबरच तो त्यांना असेंबलही करतो. त्याला बाईकशी छेडछाड करायला आवडते. नशिबाने त्याला अभिनेता बनवले, नाहीतर तो कुठेतरी मेकॅनिक झाला असता, असे त्याने म्हटले. अभिषेकने एका जुन्या मुलाखतीत सांगितले होते की, जॉन अब्राहमनेच त्याला बाइक चालवायला शिकवले होते. आधी अभिषेक बाईक चालवताना घाबरला होता. अभिषेक आणि जॉनने धूम चित्रपटात एकत्र काम केले होते. चित्रपटाचा केंद्रबिंदू सुपर बाईकच होत्या.

अभिषेक बच्चन त्याच्या आगामी 'घूमर' चित्रपटामुळे चर्चेत आहे. चित्रपटाच्या प्रमोशनदरम्यान त्याला बाइकबाबतही काही प्रश्न विचारण्यात आले. तो म्हणाला- माझा एक मित्र आहे, जॉन अब्राहम. मला वाटते की त्याला बाईक खूप आवडतात. तो आधी बाईक डिस्मेंटल करतो आणि नंतर पुन्हा असेंबल करतो. त्याला हे काम खूप आवडते. मी त्याच्याकडून बाइक्सबद्दल खूप काही शिकलो आहे.

# सायलीने गायलं गाणं!



'ठरलं तर मग' मालिकेत सध्या सुभेदार कुटुंबीयांनी अर्जुन आणि प्रियाच्या लग्नासाठी जोरदार तयारी सुरू केली आहे. पूर्णा आजीला दिलेल्या वचनामुळे अर्जुन मनाविरुद्ध हे लग्न करणार असतो. पण, सायलीने मात्र काही केल्या 'मी माझ्याच नवऱ्याशी लग्न करेन' असा निश्चय मालिकेत केलेला आहे. यासाठी ती चैतन्य आणि कुसुम या दोघांना हाताशी घेऊन विविध प्रयत्न करताना दिसत आहे. आता सायली-अर्जुनचं लग्न लावण्यात ऐनवेळी कोण पुढाकार घेणार या गोष्टी मालिकेच्या आगामी भागात स्पष्ट होतील. पण, त्याआधी एका रोमँटिक प्रोमोने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे.सायली आणि अर्जुन यांच्यासह या आठवड्यात संपूर्ण 'ठरलं तर मग' मालिकेची टीम सिद्धार्थ जाधवचा शो 'आता होऊ दे धिंगाणा ३'मध्ये सहभागी होणार आहे. या शोमध्ये येत्या भागात प्रेमाचा आठवडा साजरा करण्यात येणार आहे. याची पहिली झलक नुकतीच समोर आली आहे. प्रोमोच्या सुरुवातीला अर्जुन सुंदर बासरी वाजवत असल्याचं पाहायला मिळतं. यानंतर सायली आपल्या मनातील भावना सर्वांसमोर व्यक्त करते.अर्जुन या शोमध्ये पहिल्यांदाच बासरी वाजवणार आहे. त्याच्या बासरीचा सुमधूर आवाज ऐकून सगळेच तृप्त होतात. यानंतर सायली म्हणते, "गळ्यात घालून प्रेमाचा हार यावेळी तरी करशील का साता जन्मीच्या सोबतीचा करार" याचा अर्थ आता सायली

# मला हेच करायचे आहे'

फिल्मफेअर पुरस्कार सोहळ्यात अभिनेत्री नुसरत भरुचाने परिधान केलेला गाऊन सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरला. काहींनी तिच्या या बोल्ड लूकची स्तुती केली तर अनेकांनी कपड्यांच्या स्टाइलवरून टीका केली. ट्रोलिंगला न जुमानता मला जसं वागायचं आहे तसंच मी वागेन असं बेधडक उत्तर नुसरत टीकाकारांना दिलं आहे. 'टाइम्स ऑफ इंडिया'ला दिलेल्या मुलाखतीत नुसरतने ट्रोलिंगवर प्रतिक्रिया दिली आहे. "सध्याची सोशल मीडियावरची परिस्थिती अत्यंत गुंतागुंतीची आहे. त्यावरील गोष्टींवर आपलं काहीच नियंत्रण नाही. अनेकजण आपली आवड, नावड त्यावर स्पष्टपणे व्यक्त करतात. ज्यांना एखादी गोष्ट नाही आवडली, त्यांना ते स्पष्टपणे बोलण्याचा अधिकार नक्कीच आहे आणि मी प्रत्येकाचा मताचा आदर करते. पण मी ज्याप्रकारचे कपडे परिधान करते, ते एकप्रकारे माझं मतंच आहे की मला हेच करायचंय आणि मी अशीच आहे. माझ्या मताचाही लोकांनी आदर करावा", अशा सडेतोड शब्दांत तिने ट्रोलर्सना सुनावलं. त्याचसोबत ट्रोलिंगचे कमेंट्स वाचत नसल्याचंही तिने सांगितलं. मला जे करायचं आहे ते मी करते, पण ते तुम्हाला आवडलंच पाहिजे असं नाही. तुमची आवड किंवा नावड हा पूर्णपणे तुमचा वैयक्तिक मत आहे, असं ती पुढे म्हणाली.नुसरतने फिल्मफेअर पुरस्कार सोहळ्यात 'हाय स्लीट गाऊन' परिधान केला होता. या गाऊनचा कट फार वरपर्यंत असल्याने त्यावरून नेटकऱ्यांनी नुसरतला ट्रोल केलं. 'आज कालचे फॅशन डिझायनर कुठे कात्री लावतील सांगता येत नाही,' असं एकाने लिहिलं तर दुसऱ्या एक फॉलोअरने, 'अरे आपल्या देशात किती गरिबी आली आहे,' अशी कमेंट केली होती.नुकत्याच पार पडलेल्या फिल्मफेअर पुरस्कार सोहळ्यात अभिनेत्री नुसरत भरुचाने परिधान केलेला गाऊन सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरला.



# आपल्याला मुद्दाम चुकीचं का दाखवलं गेलं?



'बिग बॉस मराठी'च्या पाचव्या पर्वातून घराघरात पोहोचलेली कोकण कन्या अंकिता प्रभू वालावलकर सोशल मीडियावर खूप सक्रिय असते. नेहमी आपल्या व्यावसायिक आणि वैयक्तिक आयुष्याबाबत पोस्ट करत असते. तसंच आजूबाजूच्या घडामोडींवर परखड भाष्य करत असते. लवकरच अंकिता बोहल्यावर चढणार आहे. त्यामुळे सध्या ती जोरदार लग्नाची तयारी करताना दिसत असून अनेकांना निमंत्रण देताना पाहायला मिळत आहे. काही दिवसांपूर्वी अंकिताने मनसे अध्यक्ष राज ठाकरेंना लग्नाचं निमंत्रण दिलं. यासाठी अंकिता होणारा पती कुणाल भगतसह राज ठाकरेंच्या निवासस्थानी 'शिवतीर्थ'वर गेली होती. त्यानंतर स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी ती अक्कलकोटला गेली होती. याचे नुकतेच तिने फोटो शेअर केले आहेत.अंकिता वालावलकरने अक्कलकोटचे फोटो शेअर करत एक सुंदर पोस्ट लिहिली आहे. तिच्या या पोस्टने सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं आहे. तिने लिहिलं, "काल स्वामींचं दर्शन घेऊन आलो... मनात खूप गोष्टी होत्या...सतत वाटायचं की खोटं वागणाऱ्यांबरोबर चांगलं का होतं? आपण खरं वागून चुकीचे का वाटतो? आपल्याला मुद्दाम चुकीचं का दाखवलं गेलं? पण अक्कलकोट हे एक असं स्थान आहे जिथे सगळ्या प्रश्नांची उत्तरं मिळतात...एक कायम लक्षात ठेवा 'कर्माच्या हिशोबात उशीर होतो, चूक होतं नाही, बाकी तो बघता, तेचो लक्ष आसा' कुणाल तू माझ्या कर्माचं एक फळ."अंकिता भगतच्या या पोस्टवर तिच्या बऱ्याच चाहत्यांनी प्रतिक्रिया दिल्या आहेत. पण एका नेटकऱ्याने खोचक प्रतिक्रिया दिली आहे. ज्यावर अंकिताने त्याला चांगलंच सुनावलं. तो नेटकरी म्हणाला की, तुला तशी पण गरजच होती 'अक्कल'कोटला जायची. यावर अंकिता प्रत्युत्तर देत म्हणाली, "तुमच्यातल्या नकारात्मकतेला स्वामी सकारात्मकतेने बदलून तुमच्या कुटुंबाचं भलं करू देत. श्री स्वामी समर्थ."'बिग बॉस मराठी'च्या पाचव्या पर्वातून घराघरात पोहोचलेली कोकण कन्या अंकिता प्रभू वालावलकर सोशल मीडियावर खूप सक्रिय असते. नेहमी आपल्या व्यावसायिक आणि वैयक्तिक आयुष्याबाबत पोस्ट करत असते. तसंच आजूबाजूच्या घडामोडींवर परखड भाष्य करत असते. लवकरच अंकिता बोहल्यावर चढणार आहे.

# तिकीट विक्रीदरम्यान चेंगराचेंगरी!

## गर्दीवर नियंत्रण न राहिल्याने मोठ्या प्रमाणावर गोंधळ

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत वि इंग्लंड वनडे मालिका भारतात उद्या म्हणजेच ६ फेब्रुवारीपासून खेळवली जाणार आहे. या मालिकेतील पहिला सामना नागपूरमध्ये तर दुसरा सामना कटकमध्ये खेळवला जाणार आहे. डिसेंबर २०१९ नंतर प्रथमच कटकमध्ये एकदिवसीय सामना खेळवला जाणार आहे. कदाचित याच कारणामुळे कटक स्टेडियमबाहेर भारत विरुद्ध इंग्लंड दुसऱ्या एकदिवसीय सामन्याची ऑफलाइन तिकिटं मिळविण्यासाठी हजारो चाहत्यांची गर्दी जमली होती आणि त्यात चेंगराचेंगरी देखील झाली.**




ओडिशातील बाराबती स्टेडियमबाहेर क्रिकेट चाहत्यांनी गोंधळ गातला. भारत आणि इंग्लंड यांच्यातील दुसऱ्या एकदिवसीय सामन्याचे तिकिट काढण्यासाठी मोठी गर्दी पाहायली आणि त्यामुळे चेंगराचेंगरीसारखी परिस्थिती निर्माण झाली. काही लोक तर बेशुद्धदेखील झाले, तर काही लोक गर्दीच्या तिकीट काउंटरमध्ये धडपड करत होते.गर्दीवर नियंत्रण न राहिल्याने मोठ्या प्रमाणावर गोंधळ उडाला, स्थानिकांनी प्रशासनावर चुकीचे नियोजन आणि अपुऱ्या सुविधांमुळे अशी घटना घडल्याचा आरोप केला. निराश चाहत्यांनी पिण्याच्या पाण्यासारख्या मूलभूत सुविधांचा अभाव आणि जाण्यायेण्याचा योग्य मार्ग तयार केले नसल्याची टीका केली, ज्यामुळे तणाव वाढल्याने परिस्थिती आणखी वाईट झाली. टीम इंडियाच्या या सामन्याची तिकिटे काढण्यासाठी क्रिकेटप्रेमी मोठ्या संख्येने स्टेडियमवर पोहोचले होते. मात्र काही चाहते तिकिटासाठी काउंटरवर चढू लागले, त्यामुळे पोलिसांना पाचारण करावे लागले. या सर्व प्रकारामुळे चेंगराचेंगरीसारखी परिस्थिती निर्माण झाली असून सुरक्षा व्यवस्था सांभाळण्यासाठी पोलिसांना मोठी कसरत करावी लागली. मीडिया रिपोर्ट्सनुसार, प्रचंड गर्दी रोखण्यासाठी पोलिसांना लाठीचार्जसह पाण्याच्या तोफांचा अवलंब करावा लागला. मंगळवारी रात्रीपासूनच हजारो क्रिकेट रसिक आपल्याला तिकिट मिळावं या आशेने स्टेडियमजवळ जमू लागले. बुधवारी पहाटेपर्यंत लांबलचक रांगा लागल्या होत्या, काही चाहत्यांनी तर आवडत्या क्रिकेटपटूंना खेळताना पाहण्याची संधी गमावू नये यासाठी रात्रबाहेर घराबाहेर होते. बुधवारी सकाळी ९ वाजता ऑफलाइन तिकीट विक्री सुरू झाली, तेव्हा गर्दी झपाट्याने उफाळून आली. तिकीट उपलब्ध असल्याची माहिती पसरताच, परिस्थिती आणखी बिघडली. तिकीट विक्री नीट न झाल्याने अनेक स्थानिक प्रसारमाध्यमांनी ओडिशा क्रिकेट असोसिएशनवर टीका केली. या चेंगराचेंगरीमध्ये अनेक जणांना भोवळ आल्याची तर काही जण जखमी झाल्याची माहितीदेखील येत आहे.आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामना अनेआंतरराष्ट्रीय सामना २०२२ मत्याचवेळी, विराट कोहली आणि रोहित शर्मा बाराबती स्टेडियमवर खेळण्याची ही गेल्या पाच वर्षातील पहिलीच वेळ आहे. या दोन स्टार खेळाडूंनी शेवटचा एकदिवसीय सामना २०१९ मध्ये कटक येथे वेस्ट इंडिजविरुद्ध खेळला होता, जेव्हा कोहलीला भारताच्या विजयाचा सामनावीर म्हणून गौरवण्यात आले होते.. या सर्व प्रकारामुळे चेंगराचेंगरीसारखी परिस्थिती निर्माण झाली असून सुरक्षा व्यवस्था सांभाळण्यासाठी पोलिसांना मोठी कसरत करावी लागली. मीडिया रिपोर्ट्सनुसार, प्रचंड गर्दी रोखण्यासाठी पोलिसांना लाठीचार्जसह पाण्याच्या तोफांचा अवलंब करावा लागला.मंगळवारी रात्रीपासूनच हजारो क्रिकेट रसिक आपल्याला तिकिट मिळावं या आशेने स्टेडियमजवळ जमू लागले.

### काही जण झाले बेशुद्ध

ओडिशातील बाराबती स्टेडियमबाहेर क्रिकेट चाहत्यांनी गोंधळ गातला. भारत आणि इंग्लंड यांच्यातील दुसऱ्या एकदिवसीय सामन्याचे तिकिट काढण्यासाठी मोठी गर्दी पाहायली आणि त्यामुळे चेंगराचेंगरीसारखी परिस्थिती निर्माण झाली. काही लोक तर बेशुद्धदेखील झाले, तर काही लोक गर्दीच्या तिकीट काउंटरमध्ये धडपड करत होते.गर्दीवर नियंत्रण न राहिल्याने मोठ्या प्रमाणावर गोंधळ उडाला, स्थानिकांनी प्रशासनावर चुकीचे नियोजन आणि अपुऱ्या सुविधांमुळे अशी घटना घडल्याचा आरोप केला. निराश चाहत्यांनी पिण्याच्या पाण्यासारख्या मूलभूत सुविधांचा अभाव आणि जाण्यायेण्याचा योग्य मार्ग तयार केले नसल्याची टीका केली, ज्यामुळे तणाव वाढल्याने परिस्थिती आणखी वाईट झाली.टीम इंडियाच्या या सामन्याची तिकिटे काढण्यासाठी क्रिकेटप्रेमी मोठ्या संख्येने स्टेडियमवर पोहोचले होते. मात्र काही चाहते तिकिटासाठी काउंटरवर चढू लागले, त्यामुळे पोलिसांना पाचारण करावे लागले.

---

# प्लेअर ऑफ द टूर्नामेंट’ : रैनाचं भाकीत!

## विराट-रोहित नव्हे तर शुबमन गिल ठरणार स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आता आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ सुरू होण्यासाठी काही आठवडे शिल्लक राहिले आहेत. १९ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या या स्पर्धेबद्दल चाहते, क्रिकेट तज्ज्ञ आणि माजी क्रिकेटपटूंमध्ये जोरदार चर्चा सुरू आहे. यासोबतच अंदाजांची मालिकाही सुरूच झाली आहे.**



अनेक तज्ञांनी त्यांच्या आवडत्या उपांत्य फेरीतील आणि अंतिम फेरीतील संघांची नावे सांगितली आहेत. अशात सुरेश रैनाने चॅम्पियन्स ट्रॉफीच्या ‘प्लेअर ऑफ द टूर्नामेंट’बाबत आश्चर्यकारक भाकीत केले आहे. भारताचा माजी डावखुरा फलंदाज सुरेश रैनाने चॅम्पियन्स ट्रॉफीचा ‘प्लेअर ऑफ द टूर्नामेंट’ कोण असेल याबाबत भविष्यवाणी केली आहे. त्याने भारतीय कर्णधार रोहित शर्मा किंवा स्टार फलंदाज विराट कोहलीचे नाव घेतले नाही. युवा फलंदाज शुबमन गिल हा चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत सर्वोत्तम खेळाडू ठरेल, असा विश्वास रैनाने व्यक्त केला आहे. स्टार स्पोर्ट्सवर बोलताना सुरेश रैना म्हणाला, “शुबमन गिल चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मध्ये टूर्नामेंटचा सर्वोत्तम खेळाडू ठरला, तर मला आश्चर्य वाटणार नाही.”शुबमन गिल एकदिवसीय फॉर्मेटमध्ये आयोजित केल्या जाणाऱ्या आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मध्ये रोहितसोबत भारतासाठी सलामी देताना दिसू शकतो. त्याने २०१९ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते. गिलने आतापर्यंत ४७ एकदिवसीय सामन्यांमध्ये ५८.२० च्या सरासरीने आणि १०१.७४ च्या स्ट्राईक रेटने २३२८ धावा केल्या आहेत. ज्यामध्ये ६ शतके आणि १३ अर्धशतके झळकावली आहेत. त्याची सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्या २०८ आहे. गिलने २०२३ मध्ये न्यूझीलंडविरुद्धच्या वनडे सामन्यात द्विशतक झळकावले होते.

### 23 फेब्रुवारीला भारत - पाक सामना

भारतीय संघाचा उपकर्णधार बनवण्यात आले आहे.दुबई येथे पाकिस्तानने आयोजित केलेल्या चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये भारत आपले सर्व सामने हायब्रीड मॉडेल अंतर्गत खेळणार आहे. भारता २० फेब्रुवारीला बांग्लादेशविरुद्धच्या सामन्याने आपल्याला मोहिमेला सुरुवात करेल. यानंतर २३ फेब्रुवारीला भारताचा दुसरा सामना कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानशी होणार आहे. भारताला तिसऱ्या साखळी सामन्यात न्यूझीलंडचा सामना (२ मार्च) करायचा आहे. जर भारत उपांत्य फेरी आणि अंतिम फेरीत पोहोचला तर त्याचे सामने दुबईतच होतील.

## विद्यार्थ्यांच्या तणावमुक्तीसाठी सूर्यनमस्कार शास्त्रशुद्ध पर्याय

# सूर्यनमस्कारामुळे विद्यार्थ्यांमध्ये एकाग्रता!

### कविता कडू पाटील : सूर्यनमस्कार महोत्सवात गायत्री इंग्लिश मिडीयम शाळेचा उत्स्फूर्त सहभाग

| पिंपरी-चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**सूर्यनमस्कारामुळे विद्यार्थ्यांमध्ये एकाग्रता जागरूक होण्यास मदत होते. धकाधकीचे जीवन, अभ्यासाचा ताण विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होत असल्याचे दिसून येत आहे. यातून मार्ग काढण्यासाठी सूर्यनमस्कार शास्त्रशुद्ध पर्याय असल्याचे गायत्री इंग्रजी माध्यम शाळेच्या व्यवस्थापकीय संचालिका कविता कडू पाटील म्हणाल्या.**



गायत्री इंग्लिश मिडीयम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी जागतिक सूर्यनमस्कार दिनानिमित्त आयोजित सूर्यनमस्कार महोत्सव २०२४-२५ मध्ये सहभाग नोंदविला. पिंपरी चिंचवड महानगरपालिका व आशाकिरण सोशल फाऊंडेशन, थेरगाव यांच्या संयुक्त विद्यमाने (दि 4) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे मोरया गोसावी क्रीडांगण, केशवनगर येथे सूर्यनमस्कार जनजागृती अंतर्गत "जागतिक सूर्यनमस्कार दिन २०२५" या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कविता कडू पाटील म्हणाल्या आजकालच्या धकाधकीच्या जीवनात मनुष्याची मनःशांती हरवत चालली आहे. यामध्ये विद्यार्थ्यांवर जास्त परिणाम होत असल्याचे दिसून आले आहे. ही मनशांती स्थिर करण्याकरिता योगा व सूर्यनमस्कार महत्वाचा आहे. अशा प्रकारच्या विधायक कार्यक्रमाकरीता जास्तीत जास्त पिंपरी चिंचवड शहरातील खाजगी व मनपा शाळेतील विद्यार्थी एकत्र आले यातून ताणविरहित जीवनशैलीचा एक नवा अध्याय सुरू होत असल्याचेही कडू पाटील म्हणाल्या. या कार्यक्रमाकरिता गायत्री शाळेच्या विद्यार्थ्यांना शाळेचे संस्थाध्यक्ष विनायक भोंगाळे यांचे प्रोत्साहन लाभले. संस्थेचे सचिव संजय भोंगाळे, विश्वस्त सरितताई विखे पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी , सर्व मुख्याध्यापक-उपमुख्याध्यापक, शिक्षकवृंद यांनी मुलांचे व क्रिडा शिक्षकांचे विशेष कौतुक केले.यासाठी क्रीडा शिक्षक अश्विनी कागळे , रवींद्र कालवाई यांनी मार्गदर्शन केले.

## एस. बी. पाटील आर्किटेक्चर मध्ये "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" उत्साहात

### शिक्षण विश्व : मराठी भाषेच्या संवर्धनासाठी जागरूकतेसाठी पुढाकार

| पिंपरी-चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**इंदुरी येथील प्रा. रामकृष्ण मोरे महाविद्यालयाने ऐतिहासिक स्थळे योजनेतंर्गत किल्ले संवर्धन योजनेअंतर्गत इंदुरी किल्ल्यावर कार्यशाळेचे आयोजन करण्याबरोबरच किल्ल्याची साफसफाई केली. यामध्ये विविध महाविद्यालयातील 58 स्वंयसेवक सहभागी झाले होते.**



पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) संचालित एस. बी. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर अँड डिझाइनमध्ये, १ जानेवारी ते २८ जानेवारी या कालावधीत "वाचन संकल्प महाराष्ट्राचा व मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती रुजविणे व मराठी भाषेच्या संवर्धनासाठी जागरूकता निर्माण करणे आणि त्यास प्रोत्साहन देण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यानिमित्त ग्रंथालयात पुस्तकांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. प्रदर्शनास विद्यार्थ्यांसह इतर अनेक पालकांनी, वाचकांनी भेट दिली. ग्रंथालयात सामूहिक वाचन सत्र आयोजित करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचारी सहभागी झाले होते.

मराठी भाषेचा प्रचार व प्रसार करण्यासाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमात प्रभारी प्राचार्य प्रा. शिल्पा पाटील, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले. ग्रंथपाल पूनम सांगळे यांनी ग्रंथालयात दृकश्राव्य माध्यमातून कवी-लेखक ग. दि. माडगूळकर, बा. भ. बोरकर, बहिणाबाई, वि. स. खांडेकर, कुसुमाग्रज यांच्या साहित्याविषयी माहिती सांगितली. पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.


Golden opportunity for Pune & PCMC student's
GURUKUL ONLINE CLASSES
YOUR CHILD'S FUTURE IS OUR PRIORITY
Nursary to 7th
All Subjects, Only Special Subject Available..
Math's, EVS, All language
Admission Open
Batch Starts 7th June 2023
MORE INFO
96577 67000 / 70209 85375
EXPRESS MEDIA ENTERPRISES
आजच प्रवेश निश्चित करा...आणि निश्चिंत रहा..!

### प्रतिभा इंटरनॅशनल स्कूल, ज्युनियर कॉलेजच्यावतीने स्पोर्ट्स डे

# परेड संचालन स्पर्धेत विद्यानंद भवन प्रथम

## प्रतिभा इंटरनॅशनल स्कूलमधील क्रीडा स्पर्धांना जिल्ह्यातून प्रतिसाद




। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**चिंचवड येथील कमला एज्युकेशन सोसायटी संचलित प्रतिभा इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनियर कॉलेजच्या वतीने आयोजित स्पोर्ट्स डे व अंतर महाविद्यालयीन परेड संचलन स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.**

संस्थेचे संस्थापक सचिव डॉ दीपक शहा यांच्या प्रेरणेने व कॉलेजच्या प्राचार्या वृंदा जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली स्पोर्ट्स डे व अंतर महाविद्यालयीन परेड संचलन स्पर्धेचे आयोजन निगडी येथील मदनलाल धिंग्रा मैदानावर करण्यात आले होते. त्यात विद्यानंद भवन प्रथम क्रमांक, एम्प्रोस इंटरनॅशनल स्कूल द्वितीय तर तृतीय क्रमाक विभागून पार्श्व प्रज्ञालय ज्ञान संस्कार मंदिर व प्रतिभा इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनियर कॉलेज यांना देण्यात आला. कमला एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक, सचिव डॉ. दीपक शहा, खजिनदार डॉ भूपाली शहा, विद्यालयाच्या प्राचार्या वृंदा जोशी, प्रमुख पाहुणे आर्मी एअर डिफेन्सचे रिटायर्ड सुभेदार मेजर प्रकाश जाधव, इंडियन एअर फोर्सचे रिटायर्ड वारंट ऑफिसर मनोज भांजा, सेंट अँन्स विद्यालयाच्या प्राचार्या क्लैरा दास, मातृ विद्यालयाचे संचालक स्वामीनाथन, संस्थापक श्रीधर साईनाथ, प्राचार्या लुमा शेरियन, उपप्राचार्या लीजा सोजू व समन्वयीका गुलनाज खान यांच्या उपस्थितीत विजेत्याना चषक, प्रशस्तीपत्रके व सहभागी महाविद्यालये, शाळांना प्रशस्तीपत्रके देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाची प्रस्तावना प्राचार्या वृंदा जोशी यांनी केली सूत्रसंचालन शिक्षिका प्राजक्ता डिंगणकर यांनी तर आभार उपप्राचार्या लीजा सोजू यांनी मांनले.

# पीसीपीच्या विद्यार्थ्यांची बुद्धिबळ आणि कॅरम स्पर्धेत "हॅट्रिक"

## शिक्षण विश्व : बुद्धिबळ आणि कॅरम स्पर्धेत सलग तीन वर्ष विजेतेपद




। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**इंटर इंजीनियरिंग डिप्लोमा स्टुडन्ट स्पोर्ट्स असोसिएशन, डी. १ झोन च्या वतीने विविध वैयक्तिक व सांघिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये बुद्धिबळ आणि कॅरम स्पर्धेत सलग तीन वर्ष विजेतेपद मिळवून हॅट्रिक केली.**

कॅरम स्पर्धेत पिंपरी-चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) पिंपरी चिंचवड पॉलीटेक्निक (पीसीपी) मधील मुलांच्या संघाने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. पीसीपीच्या संघाने या स्पर्धेत सलग तीन वर्ष विजेतेपद पटकावून हॅट्रिक साध्य केली. मुलींच्या संघाने कॅरम स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले व बुद्धिबळ स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला.

सौ. वेणुताई पॉलिटेक्निक, पुणे येथे झालेल्या मुलांच्या कॅरम स्पर्धेत विजेत्या संघांना प्राचार्या डॉ. एम. एस. जाधव , समन्वयक डी – १ झोनल हेडकॉटर वाय. एल. निंबाळकर यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरवण्यात आले. द्वितीय क्रमांक मुलांच्या स्पर्धेमध्ये जी. पी. अवसरी संघाने मिळवला.

अजिंक्य डी. वाय. पाटील लोहगाव, पुणे येथे झालेल्या मुलींच्या बुद्धिबळ व कॅरम स्पर्धेत विजेत्या व उपविजेता संघांना प्राचार्या डॉ. एफ. बी. सय्यद, पॉलीटेक्निक कॉर्डिनेटर एन. एल. शेळके व स्पोर्ट्स कॉर्डिनेटर अतुल हिवळे यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरवण्यात आले. कॅरम स्पर्धेत द्वितीय क्रमांक मुलींच्या स्पर्धेमध्ये जी. पी. अवसरी संघाने मिळवला. तर चेस स्पर्धेत पहिला क्रमांक वाडिया कॉलेज पुणे यांनी मिळवला. यशस्वी विद्यार्थी व संघ व्यवस्थापक प्रा. संपत ननवरे, राजू गायकवाड, मारुती गायकवाड, प्रा. कोमल वाणी, प्रा. रेशमी ओव्हाळ, क्रीडा समन्वयक सुनील जगताप, किशोर गव्हाणे, लक्ष्मी थरकुडे, प्राचार्या डॉ. विद्या बॅंकोड यांचे पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी अभिनंदन केले.



पिंपरी-चिंचवड

# पोलिस आयुक्त कार्यालय

## भूमिपूजन सोहळा


- दिनांक व वेळ -

**गुरूवार, दि. 6 फेब्रुवारी 2025 रोजी दुपारी 12 वाजता.**

- स्थळ -

**गट नंबर 539, एमएनजीएल पंपासमोर, जाधववाडी, चिखली.**

दिला शब्द केला पुर्ण..!



- शुभहस्ते -

**मा.श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब**

(मुख्यमंत्री तथा गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य)



"स्वतंत्र पोलीस आयुक्तालयासाठी 2017 मध्ये पिंपरी-चिंचवडकरांना शब्द दिला होता. राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली 2018 मध्ये पोलीस आयुक्तालयाचे कामकाज सुरू झाले. आयुक्तालयासाठी हक्काची जागा मिळण्याबाबत पुन्हा पाठपुरावा केला. त्यालाही महायुती सरकारच्या काळात मंजुरी मिळाली. पिंपरी-चिंचवड शहराच्या प्रगतीशील वाटचालीमध्ये मैलाचा दगड असलेल्या या ऐतिहासिक वास्तुची आज पायाभरणी होत आहे. याचे मनोमन समाधान वाटते.

**पिंपरी-चिंचवडकरांच्या हक्कांचा विचार... म्हणजे भाजपा सरकार!**

तमाम पिंपरी-चिंचवडकरांच्यावतीने महायुती सरकार आणि मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांचे मन:पूर्वक आभार!



**महेश किसनराव लांडगे**

**आमदार,** भोसरी विधानसभा